आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१३ ऑक्टोबर २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री गतीशक्ती बृहद आराखड्याला तीन वर्ष पूर्ण झाल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे प्रंशसोद्गार

- माजी मंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांची काल मुंबईत हत्या, आज शासकीय इतमामात होणार अंत्यसंस्कार

- मराठी भाषा भवन, सावित्रीदेवी फुले छात्रालयासह अनेक नवीन प्रकल्प आणि विकासकामांचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते भूमिपूजन तसंच लोकार्पण

- आशियाई टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत महिला दुहेरी प्रकारात भारताच्या ऐहिका मुखर्जी आणि सुतीर्था मुखर्जी या जोडीने पटकावलं कांस्यपदक

**आणि**

- महिला टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघाची लढत आज ऑस्ट्रेलियाशी होणार

**<><><><><>**

भारताच्या पायाभूत सेवा क्षेत्राचा कायापालट करण्यात एक परिवर्तनकारी उपक्रम म्हणून उदयाला आलेल्या पीएम गतीशक्ती ब्रृहद आराखड्याला तीन वर्ष पूर्ण झाल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रशंसा केली आहे. गतिशक्ति उपक्रमानं देशाच्या मल्टीमोडल संपर्कव्यवस्थेला लक्षणीय चालना दिली असून प्रत्येक क्षेत्रात जलदगतीनं आणि कार्यक्षम विकास साध्य करण्यात मोलाचं योगदान दिलं आहे, असं प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

विविध भागधारकांच्या समन्वयामुळे लॉजिस्टिक्सला चालना मिळाली आहे, विलंब कमी होऊ लागला आहे आणि अनेकांसाठी नव्या संधी निर्माण होत आहेत, असं त्यांनी म्हटलं आहे. गतिशक्ति उपक्रमाच्या माध्यमातून विकसित भारताच्या स्वप्नाच्या ध्येयपूर्तीकडे वेगाने वाटचाल सुरु असून त्यामुळे प्रगती, नवोन्मेष आणि उद्योजकतेला प्रेरणा मिळत आहे, असं ते म्हणाले. २०२१ मध्ये सुरु झाल्यानंतर पी एम गतिशक्ति उपक्रमाअंतर्गत आजपर्यंत विविध मंत्रालयांच्या समन्वयानं १५ लाख कोटी रुपयांचे २०८ पायभूत प्रकल्प पूर्ण झाले आहेत.

<><><><><>

ब्रिटनचे माजी प्रधानमंत्री बोरिस जॉन्सन यांनी आपल्या नव्या पुस्तकात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा ‘अमुलाग्र बदल घडवणारा नेता’ असा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. जॉन्सन यांनी आपल्या पुस्तकाचा एक संपूर्ण अध्याय भारत - ब्रिटन संबंधांना समर्पित केला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या रुपानं ब्रिटनला मित्र लाभला आणि या मैत्रीमुळेच भारत - ब्रिटन मुक्त व्यापार कराराचा पाया रचला गेला, असं त्यांनी आपल्या पुस्तकात म्हटलं आहे.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज सकाळी अल्जीरिया, मॉरिटानिया आणि मलावी या ३ राष्ट्रांच्या भेटीवर रवाना झाल्या. या आफ्रिकी देशांना भेट देणाऱ्या त्या पहिल्या भारतीय राष्ट्रपती आहेत. त्या आज रात्री अल्जीरियात दाखल होतील. अल्जीरिया भेटीत त्या अनेक द्विपक्षीय बैठका घेतील आणि सोबतच भारतीय वंशाच्या लोकांची भेट घेतील. त्या अल्जीरियाच्या राष्ट्राध्यक्षांची भेट घेतील तसंच तेथील सांस्कृतिक आणि ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाच्या स्थळांनाही त्या भेट देतील. १६ तारखेला त्या मॉरिटानियाला तर १७ तारखेला त्या मलावी या देशाला भेट देतील.

**<><><><><>**

जिनिव्हा इथं आजपासून सुरु होणाऱ्या आंतर संसदीय संघाच्या एकशे एकोणपन्नासाव्या बैठकीला लोकसभेचे सभापती ओम बिर्ला भारतीय प्रतिनिधीमंडळाचं नेतृत्व करणार आहेत. ही बैठक येत्या १७ तारखेपर्यंत असून शांततापूर्ण आणि शाश्वत भविष्यासाठी विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेषाचा वापर ही या बैठकीची संकल्पना आहे. ओम बिर्ला, कार्यकारी मंडळाच्या बैठकीला उपस्थित राहणार असून याव्यतिरिक्त जिनिव्हा मधल्या भारतीय समुदायाशी देखील संवाद साधणार आहेत. तसंच यानिमित्तानं विविध देशांच्या संसद प्रतिनिधींसह चर्चा करणार आहेत. भारताच्या प्रतिनिधिमंडळात राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंश सिंग, दोन्ही सभागृहांचे सरचिटणीस आणि इतर संसद सदस्यांचा समावेश आहे. यामध्ये १८० संसद सदस्य आणि १८ सहयोगी सदस्य आहेत.

**<><><><><>**

माजी मंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांची काल मुंबईत हत्या झाली. बाबा सिद्दीकी यांचे पुत्र आणि आमदार झिशान सिद्दीकी यांच्या वांद्रे इथल्या कार्यालयाबाहेर बाबा यांच्यावर तीन अज्ञातांनी गोळीबार केला. या गोळीबारात त्यांचा मृत्यू झाला. या हत्या प्रकरणाचा तपास आज सकाळपासून मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेनं सुरू केला आहे. पथकानं घटनास्थळाचा पंचनामा केला असून, ताब्यातील दोन आरोपींची चौकशी सुरू आहे. सिद्दीकी यांच्या हत्येचं कारण शोधण्याचा प्रयत्न पोलिस करीत आहेत.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर मुंबईत कोणतीही टोळी पुन्हा सक्रीय होणार नाही, याची खबरदारी घेण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पोलिसांना दिल्या आहेत. दरम्यान, बाबा सिद्दीकी यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. त्यानुसार सिद्दिकी यांच्या पार्थिवावर

मरीन लाईन्स इथल्या बडा कब्रस्तान दफनभूमीत शासकीय इतमामानं अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. या पार्श्वभूमीवर सर्वत्र पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

राजकीय नेत्याच्या हत्येमुळं विरोधी पक्षांनी राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था बिघडली आहे, असा आरोप करत गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

<><><><><>

मराठी भाषा भवन, सावित्रीदेवी फुले छात्रालयासह अनेक नवीन प्रकल्पांचं आणि विविध विकासकामांचं भूमिपूजन तसंच लोकार्पण आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई इथं केलं. यावेळी शिक्षणमंत्री दीपक केसरकर, सभापती नीलम गोऱ्हे, ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मराठी भाषा ही अभिजात आहेच पण आता याला राजमान्यता मिळाली म्हणून मराठीप्रेमींमध्ये दसरा दिवाळीचं वातावरण आहे, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. राज्य उद्योगस्नेही असून, सर्वाधिक पायाभूत सुविधा राज्यात आहेत. पायाभूत सुविधा, उद्योग आणि कल्याणकारी प्रकल्प यांची सांगड घालण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचं ते म्हणाले. जर्मनीत चार लाख मराठी मुलांना नोकऱ्या मिळणार आहेत याचा उल्लेख त्यांनी केला.

<><><><><>

कझाकस्तानमध्ये अस्ताना इथं सुरु असलेल्या आशियाई टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत महिला दुहेरी प्रकारात भारताच्या ऐहिका मुखर्जी आणि सुतीर्था मुखर्जी या जोडीनं इतिहास रचत कास्यपदक पटकावलं आहे. आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत महिला दुहेरीमध्ये पदक मिळवणारी ऐहिका आणि सुतीर्था ही

पहिलीच भारतीय जोडी आहे. उपांत्य फेरीच्या आज झालेल्या सामन्यात जपानच्या मिवा हरिमोटो आणि मियुउ किहाराया या जोडीनं भारतीय जोडीचा पराभव केला. त्यामुळे भारताला कांस्यपदकावर समाधान मानावं लागलं.

<><><><>

महिला टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारतीय संघाची लढत ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. संयुक्त अरब अमिरातीतल्या शारजाह इथं आज संध्याकाळी साडेसातला हा सामना सुरू होईल. अंतिम फेरीतील चार संघात स्थान मिळवण्यासाठी भारताला हा सामना जिंकणं अत्यावश्यक आहे.

<><><><>

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या तीन कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेला येत्या १६ ऑक्टोबरपासून सुरूवात होत आहे. या कसोटी सामन्यासाठी नुकतीच भारतीय संघाची घोषणा करण्यात आली. या मालिकेसाठी रोहित शर्मा कर्णधार तर जसप्रीत बुमराह उपकर्णधारपदाची धुरा सांभाळणार आहे. या मालिकेतील पहिला सामना १६ ऑक्टोबरपासून बंगळुरू इथं होणार आहे. दुसरा सामना २४ ऑक्टोबरपासून पुण्यात तर तिसरा सामना एक नोव्हेंबरपासून मुंबईत होणार आहे.

<><><><>

आसाम आणि जम्मू-काश्मीरमध्ये आज सकाळी भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. आसाममधील भूकंपाची तीव्रता ४ पूर्णांक २ रिक्टर स्केल इतकी होती. आसामच्या मध्यवर्ती भागात भूकंपाचे केंद्र होते. ब्रह्मपुत्रा नदीच्या उत्तरेकडील किनाऱ्या लगत असलेल्या उदलगुडी जिल्ह्यात सकाळी ७ वाजून ४७ मिनिटांनी भूकंपांचे धक्के जाणवले. यात कोणतीही जीवित अथवा वित्त हानी झाल्याची अद्याप नोंद नाही. तर जम्मू-काश्मीरमधल्या दोडा जिल्ह्यात पहाटे ६ वाजून १४

मिनिटांनी ४ पूर्णांक ३ रिक्टर स्केल तीव्रतेचा भूकंप जाणवला. त्याचे केंद्र गुंडोह येथे होते.

**<><><><><>**

भारतानं बांगलादेश सरकारला हिंदू आणि सर्व अल्पसंख्याक आणि त्यांची प्रार्थनास्थळे, विशेषत: सणासुदीच्या काळात सुरक्षितता आणि सुरक्षा करण्याचे आवाहन केलं आहे. एका निवेदनात परराष्ट्र मंत्रालयानं ढाका येथील तंतीबाजार येथील पूजा मंडपावर झालेला हल्ला आणि सातखीरा येथील पूजनीय जेशोरेश्वरी काली मंदिरात झालेल्या चोरीबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली आहे. हे हल्ले खेदजनक असून मंदिरे आणि देवतांची विटंबना आणि नुकसान जाणीवपूर्वक केलं जात असल्याचं भारतानं म्हटलं आहे.

**//<><><><><>//**